**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

## प्रेसनोट दिनांक – ०५/१२/२०२४

### दि.०४/१२/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

पोस्टे व गु रजि.नं. :- एमआयडीसी भोसरी ६४५/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १०९,३५१(२),३५२,प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०४/१२/२०२४ रोजी सकाळी ११/३० वा.सुमारास गणपती मंदिरा जवळ,बोराटे वस्ती,संजय गांधी नगर,मोशी,पुणे येथेयेथे घडला असे

गुन्हा दाखल :- दि.०४/१२/२०२४ रोजी २१/४० वा.

फिर्यादी :- महीला फिर्यादी

आरोपी :- जावेद मधु पठाण वय ४० वर्षे रा. गणपती मंदिरा जवळ,बोराटे वस्ती,संजय गांधी नगर,मोशी,पुणे
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी राहते घरी गणपती मंदिरा जवळ,बोराटे वस्ती,संजय गांधी नगर,मोशी,पुणे येथे असतांना,फिर्यादीचे पती जावेद पठाण यांचा गेले तीन दिवसां पासुन उजवा पाय जास्त दुखत असल्याने, फिर्यादी त्यांना उपचारकामी आमचे मुळ गाव शिंदेवाडी, ता. जुन्नर,जि.पुणे येथे घेवुन जाण्यासाठी फिर्यादीचे दिर नामे साजन पठाण यांना फोन केल्याचा राग आल्याने फिर्यादीचे पती नमुद आरोपी यांनी फिर्यादीला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने,फिर्यादीचे डोक्यात लाकडी बॅट व फरशीने मारुन गंभीर जखीमी केले आहे.तसेच फिर्यादीची भावजय नामे यास्मीन सय्यद हिचे देखील डोक्यात बॅट मारुन गंभीर जखमी केले आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि चिटमपल्ले ९५९०७७९४३८

०२.

पोस्टे व गु रजि.नं. :- सांगवी ४९४/२०२४, भारतीय न्याय संहिता २०२३ चेकलम १०९, ३५२,३(५) अन्वये, भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), सह फौजदारी सुधारणा कायदा कलम ३,७ सह महा. पोलीस अधि कलम ३७(१) सह १३५ प्रमाणे,

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०३/१२/२०२४ रोजी २३.०० वा. सुमारास निअर प्रणव रेसीडेन्सी जवळ पारिजात कॉलनी, जवळकरनगर पिंपळे गुरव पुणे.

गुन्हा दाखल :- दि.०४/१२/२०२४ रोजी ०९.३९ वा

फिर्यादी :- अक्षय दत्तु कळसकर वय-२६ वर्षे, धंदा- व्यवसाय रा. निअर प्रणव रेसीडेन्सी जवळ पारिजात कॉलनी, जवळकरनगर पिंपळे गुरव पुणे.

आरोपी :- १)तन्मय अविनाश कांबळे वय १८ वर्षे ( जन्म दिनांक १५/११/२०२४ ) धंदा – शिक्षण रा. जवळकर नगर पिपळे गुरव पुणे
२) तथागत उर्फ आयुष महेद्र कोले वय २० वर्षे धंदा – नोकरी (डिलीव्हरी बॉय )रा. सुदर्शननगर पिपळेगुरव पुणे
३) अभि सुरवसे रा. सुदर्शननगर पिपळेगुरव पुणे
**आरोपी क्र.१ व २ अटक आहे**

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्याचा मित्र गगन जाधव, श्रवण लोहीरे ,असे त्याचे घराजवळ गप्पा मारत बसले असताना आरोपी क्र १ व २ हे त्यांचे मोपेड वरून आले व तुम्ही इथे गल्लीत का बसले म्हणुन वाईटवाईट शिवीगाळ केली तसेच भांडणे सोडवण्यासाठी आलेला फिर्यादी यांचा मित्र नामे उदयराज चोथवे यास शिवीगाळ करुन जवळच पडलेल्या कौलाने, दगडाने त्याचे डोक्यात मारुन गंभीर जखमी केले. तसेच आरोपी क्र ३ याने त्याचे जवळ असलेला कोयता काढुन तो फिर्यादी यांचे मानेवरती मारण्याचा प्रयत्न केला तो फिर्यादी यांनी हुकवला असतातो फिर्यादीचे डोक्यात लागला. सदर हल्यामधे कोयत्याचा एखादा वार फिर्यादीचे डोक्यात बसुन

त्यामधे फिर्यादीस गंभीर दुखापत होवुन फिर्यादीचा जीव जाईल याची जाणीव असताना देखील हल्ला केला व सदर परीसरात हातात कोयता धरुन आरडाओरडा करुन दहशत पसरविण्याच्या उददेशाने हातातील कोयता फिरविला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि भालेराव ९०६७०२३९४४

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- भोसरी एमआयडीसी ६४३/२०२४ भारतीय दंड संहिता कलम ४२० प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०१/०६/२०२४ रोजीतेदि. १२/०६/२०२४ रोजी दरम्यान यु.पी.आय.ॲपद्वारे आय/१२०६ गंधर्व एक्सलेन्स फेज -१ मोशी देहू रोड मोशी पुणे.

गुन्हा दाखल :- दि ०४/१२/२०२४ रोजी १५/२८वा

फिर्यादी :- भिकन एकनाथ दुसाने वय ६९ वर्षे धंदा सेवानिवृत्त रा.आय /१२०६ गंधर्व एक्सलेन्स फेज -१ मोशी देहू रोड मोशी पुणे

आरोपी :- सिध्देश टूर्स ॲन्ड ट्रव्हल भुसावळ याचे मालक महेश बारसु फालक मो.नं. (८३२९४७४४१३) पुर्णनाव पत्ता माहित नाही.

तपशिल :- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी नेपाळ, काशी, आयोध्या येथे यात्रेकरिता घेवून जातो असे सांगुन जर काही अडचण आल्यास प्रवासाला जाण्याचे अगोदर २० दिवस पहिले कळविले असता तुमचे तिकीट रद्द करुन सर्व पैसे परत देतो असे सांगुन विश्वास संपादन करुन फिर्यादी व त्यांचे नातेवाईक यांचेकडून एकूण २,०२,५००/- रु. घेवून फिर्यादी यांचे रेल्वेचे तिकीट बुक केले नाही. तसेच फिर्यादी यांनी त्यास पैसे परत मागितले असता त्यांनी पैसे न देता फिर्यादी यांची फसवणुक केली आहे.

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि महाडीक ९८२३२८४८५९

०४

पोस्टे व गु रजि.नं. :- नग़डी ५६७/२०२४ भा.दं.वि.कलम ४०६,४२०, ५०६ प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२०/०३/२०१९ ते दि.०४/०५/२०२३ रोजी पर्यंत आर एम ४७, जय मल्हार हौसींग सोसायटी, संभाजीनगर, चिंचवड, पुणे

गुन्हा दाखल :- दि.०४/१२/२०२४ रोजी २०/०८ वा

फिर्यादी :- राजेंद्र माधवराव बोडके वय ५८ वर्षे, व्यवसाय- नोकरी रा.रुम नं.६, आर एम ४७, जय मल्हार हौसींग सोसायटी, संभाजीनगर, चिंचवड, पुणे

आरोपी :- चरणदास मारुती गोरे, रा.बोलगांव फाटा, गणेश चौक,विठठल रुक्माई मंदीराचे पाठीमागे, हॉटेल दोस्तीचे समोर, ता. जि. अहमदनगर,

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांच्या मुलास नोकरी लावण्याचे आमीष दाखवुन फिर्यादीकडे दहा लाख रुपयाची मागणी करुन त्यापैकी ३,३०,०००/- रुपये युपीआय व गुगल पे, फोन पे चे माध्यमातुन वेळोवेळी पाठविण्यास सांगुन नोकरीला न लावता व घेतलेल्या रकमेपैकी १,९०,०००/- रुपये परत न देता व पैसे मागीतले म्हणुन फिर्यादीचे मुलास जिवे मारण्याची धमकी देवुन व पैशाची मागणी केल्यास आत्महत्या करण्याची धमकी दिली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- मसपोनि आजगेकर ९८३४४१६५९१

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- एमआयडीसी भोसरी ६४२/२०२४ भा.न्या.सं कलम ११८(१), ११५(२), ३२९(४)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.०३/१२/२०२४ रोजी २२/३० वा.चे दरम्यानसंजयगांधीनगर बो-हेडे वस्ती मोशी पुणे

गुन्हा दाखल :- दि.०४/१२/२०२४ रोजी ०६.०१ वा

फिर्यादी :- कैलास सुभाष सुधारे वय-३५वर्षधंदा- खाजगी कंपनीत हाउसकिपींग रा.संजयगांधीनगर बो-हाडे वस्ती मोशी पुणे

आरोपी :- १)विजय बाबासाहेब साळवे वय-२५वर्षे अंदाजे रा. संजयगांधीनगर बो-हेडे वस्ती मोशी पुणे व २)अजय

बाबासाहेब साळवे वय- २४वर्षे अंदाजे रा. संजयगांधीनगर बो-हेडे वस्ती मोशी पुणे व
३) ज्ञानेश्वर वसंत दुनघव,वय २२ वर्षे,रा.गोडावुन चौक गंधर्वनगरी इंद्रलोक कॉलनी ता.हवेली जि.पुणे
**आरोपी अटक आहेत**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादीचे शेजारी राहणारे नमुद आरोपी यांनी सांडपाण्याचे जुन्या भांडणाचे वादावरुन फिर्यादीचे घराचा दरवाजा बाहेरुन जोरजोरात वाजवुन दरवाजावर लाथा मारुन दरवाजातोडला व घरामध्ये आत येवुन आरोपी क्र १ यानेत्याचे हातामध्ये असलेल्या चाकुने फिर्यादीस डोक्याला उजव्या कानाजवळ मारुन जखमी केले त्यातुन रक्त येवुन लागलेतसेच फिर्यादीचे डाव्या हाताच्या कोप-याला चाकुने मारुन जखमी केले . तसेच आरोपी क्र २ व ३ यांनी फिर्यादीला व फिर्यादीची पत्नी शालु ही आमची भांडणे सोडविण्यासाठी आली असतातीचे हात पकडुन पाठीत व पोटामध्ये लाथा बुक्यांनी मारहाण केली म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोना लांघी ९५९४०२५३३२

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ८२१/२०२४ बी.एन.एस. २८१,१०६ (१),१२५ (A)( ए) मो वा का.कलम १८४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि. ०४/१२/२०२४ रोजी सकाळी ०७/०० वाजण्याचे सुमारास मौजे वराळे गाव हद्दीत स्पीनी कंपनी जवळ वासुलीफाटा ते आबेठाण जाणरेरोडवर वराळे ता.खेड जि.पुणे

गुन्हा दाखल :- दि.०४/१२/२०२४ रोजी १९.५४ वा

फिर्यादी :- बालाजी लालसिंग राठोड वय ४० वर्षे मीस्तरी रा. आबेठाण दिलीप नाईकनवरे यांचे भाडयाचे खोलीत आंबेठाण ता.खेड जि.पुणे

आरोपी :- दत्तात्रय मल्लीकाआर्जुन लोखंडे वय ४६ वर्षे रा.विमानतळ हात्तोरे वस्ती सोलापुर ता.जि.सोलापुर

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे राहते घरातुन आंबेठाण येथून त्यांचे मोटारसायकल क्रं.MH42 AV9238 हिचेवरून हॉलमेट न घालता कामावर जात असताना कविता कृष्णा देवकर वय ३० वर्षे यांनी लीफ्ट मागितली असता मी त्याना लिफ्ट दिली व आम्ही दोघे ही आंबेठाण कडुन वासुली फाटा कडे जात असताना स्पीनी कंपनी जवळ वराळे गाव येथे पाठीमागुन फिर्यादीचे मोटर सायकला MH 13 CU 3546 वरील चालक नामे दत्तात्रय मल्लीकाआर्जुन लोखंडे याने त्याचे ताब्यातील अशोक लेलंन्ड हयगयीने, अविचाराने, निष्काळजीपणे, रहदारीचे नियमांकडे दुलर्क्ष करुन भरधाव वेगात चालवून धडक देवुन ट्रकचे डाव्या बाजुचे पुढील चाक अंगावरुन जावून कविता कृष्णा देवकर वय ३० वर्षे रा. आबेठाण दिलीप नाईकनवरे यांचे भाडयाचे खोलीत आंबेठाण ता.खेड जि.पुणे हीस गंभिर दुखापती होवुन, उपचारापुर्वी मयत झाली आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि गिरणार ९८८१०९७७१९

०७.

पोस्टे व गु रजि.नं. :- बावधन १३५९/२०२४ भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२५(अ) (ब), २८१, ३२४ (३), मो.वा.का. क. १८४,११९/१७७ प्रमाणे.

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२९/११/२०२४ रोजी ०१/०० वा. सुमारास मबंई बंगलोर हायवे सरोवर हॉटेल समोर बालेवाडी पुणे

गुन्हा दाखल :- दि. ०४/१२/२०२४ रोजी २३.३२ वा

फिर्यादी :- वैभव भिमराव अनपट वय २६ वर्षे धंदा. नोकरी रा. रॉयल कॅटालीया सोसायटी सी/३०८,रावेत पुणे

आरोपी :- आयशर टेम्पो नंबर एम.एच.१४ के.ए. ७४४५ वरील चालक नाव पत्ता माहीत नाही

तपशिल :- वर नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्यांची पत्नी हे त्यांच्या टीव्हीएस ज्युपीटर मोटार सायकल नंबर एम.एच. १२ क्यु.व्ही.३९७० वरुन वर नमुद तारीख वेळी व ठीकाणावरुन जात असताना, यातील आरापी याने त्याचे ताब्यातील वर नमुद आयशर टेम्पो हायगयीईने, अविचारने, भरधाव वेगात, बेदरकारपणे, वाहतुकीच्या नियमाकडे दुर्लक्ष करुन चालवुन फिर्यादीचे वर नमुद मोटार सायकलला धडक देवुन फिर्यादीच्या डावे पायाचे लीगामेट तुटुन गंभीर जखमी केले व फिर्यादीच्या पत्नीला किरकोळ मार लागला तसेच फिर्यादीचे मोटार सायकलचे व लॅपटॉप व मोबाईल फोनचे नुकसान करणेस करणीभुत झाला. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- मपोउपनि कदम